# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)

**दावा क्रमांक २६/२०२२**

कैलास हरिभाऊ भोसले आणि इतर **---- वादी**

***विरुध्द***

१) अहमदनगर महानगर पालिका कर्मचारी
सहकारी पतसंस्था मर्या. अहमदनगर व इतर. **---- प्रतिवादी**

## निशाणी-७० वरील आदेश

१) वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या दाव्यात असलेले अर्जातील नमुद कागदपत्रे दाव्यात दाखल करण्याकरिता निर्देश देण्यात यावे करिता केला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीने प्रतिवादी क्र.१ संस्थेची सन २०२१-२२ ते सन २०२६-२७ कालावधीकरिता झालेली दि.१८/१२/२०२१ रोजीची निवडणूक रद्द करण्याकरिता केला आहे. प्रतिवादी क्र.४ संस्थेने सदोष निवडणूक प्रक्रिया पारपाडली आहे. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांच्याकडे तक्रार अर्ज केला आहे आणि त्या तक्रार अर्जाचे पोहोच दाखल केल्या आहेत. दाव्याचा योग्य न्यायनिर्णय होण्याकरिता खालील कागदपत्रे न्यायालयास दाखल करणे आवश्यक आहे.

१) संस्थेची ९७ व्या घटना दुरुस्तीनुसार उपविधी, २) प्रतिवादी क्र.१ संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिध्द केलेली प्रारुप मतदार यादी, ३) प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी प्रसिध्द केलेली अंतिम मतदार यादी, ४) प्रतिवादी क्र.२ ते ४ कडे दिलेले सर्व हरकत अर्ज, ५) हरकत अर्जावरील प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी घेतलेले निर्णय, ६) अशोक कराळे यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी प्रतिवादी क्र.३ कडे प्रारुप मतदार यादी दुरुस्ती आणि नावे कमी करण्याकरिता दिलेला तक्रार अर्ज आणि त्यासोबत अधिकारी यांनी दिलेले एकुण ७ दाखले आणि त्यासंदर्भात घेतलेले निर्णय.

वादीच्या म्हणण्यानुसार ही कागदपत्रे दाव्यातील न्यायनिर्णय होण्याकरिता आवश्यक आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द आदेश करण्या यावा.

२) प्रतिवादी क्र.१ संस्थेने अर्जाच्या अनुषंगाने निशाणी-७४ कडे म्हणणे दाखल केले असुन वादीने केलेले कथन नाकारले आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार निवडणुक कार्यक्रम पारपडल्यानंतर निवडणूक अधिकारी यांनी अर्जातील सर्व कागदपत्रे सिल करुन प्रतिवादी क्र.१ यांच्या ताब्यात दिले आहेत आणि ती कागदपत्रे संस्थेचे निवडणूकीचे गोपनिय आहेत आणि संस्थेला ही कागदपत्रे देण्याचा अधिकार नाही. वादीने अर्जात मागणी केलेली कागदपत्रे दाव्याशी संबंधीत नाही. वादीने केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या उद्देशाने खोटा अर्ज केला आहे. वादी हे संस्थेचे माजी चेअरमन असुन त्यांच्याकडे संस्थेची उपविधी आहे. तसेच सर्व तक्रार अर्ज हे वादी यांनीच दिले असल्याने त्यांच्याकडे अर्जात नमुद सर्व कागदपत्रे आहेत.

३) प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी वादीच्या अर्जाला निशाणी-७२ कडे म्हणणे दाख करुन नमुद केले की, संस्थेची निवडणूक नियमानुसार व कायदेशीर तरतुदींचे पालन करुन पारपाडली आहे आणि त्यानंतर निवडणूकीसंबंधीचे सर्व कागदपत्रे सिलबंद करुन संस्थेच्या ताब्यात दिलेले आहेत. प्रतिवादी क्र.५ ते २१ व २३ यांनी सुध्दा म्हणणे दाखल करुन निवेदन केले की, प्रतिवादी हे बहुमताने निवडून आलेले सदस्य आहेत. वादी यांनी मागणी केलेली कागदपत्रे यांचा दाव्याशी काही संबंध नाही.

४) वादीचे वकीलांनी अर्जातील कथनानुसार युक्तिवाद केला. प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील गैरहजर. वादीच्या अर्जातील कथनाच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित होतो की, वादी यांनी अर्जात मागणी केलेली कागदपत्रे दाव्याशी संबंधीत आहेत काय? आणि दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरिता कागदपत्रांची आवश्यकता आहे काय? वादीने सदरचा दावा प्रतिवादी संस्थे विरुध्द आणि निवडणूक अधिकारी आणि निवडून आलेल्या सदस्यांविरुध्द संस्थेची निवडणूक बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठराव होऊन दि.१८/१२/२०२१ रोजी झालेली निवडणूक रद्द करण्याकरिता केला आहे. वादीने त्यांच्या दाव्यातील केलेल्या कथनाचे अवलोकन केले असता दिसुन येते की, वादीने अंतिम मतदार यादीवरसुध्दा हरकत घेतली होती. तसेच निवडणूकीमध्ये गैरप्रकार झाल्याचेसुध्दा दाव्यामध्ये त्यांनी नमुद केले. वादीने अर्जामध्ये प्रतिवादी क्र.१ संस्थेने प्रसिध्द केलेली प्रारुप मतदार यादी आणि प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी प्रसिध्द केलेली अंतिम मतदार यादी मागणी केली आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे वादींनी

अंतिम मतदार यादीबद्दल निवडणूक प्रक्रियादरम्यान हरकतीद्वारे वाद निर्माण केल्यामुळे सदरच्या दोन्ही मतदार याद्या रेकॉर्डवर असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मतदारयादीच्या अनुषंगाने घेतल्या हरकतीसुध्दा रेकॉर्डवर असणे आवश्यक आहे. वादी यांनी नमुद केलेल्या सर्व कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ संस्थेने त्यांच्या म्हणण्यामध्ये कबुल केल्या आहेत आणि सर्व कागदपत्रे त्यांच्या ताब्यात असल्याचे मान्य केले आहे. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता वादी यांनी मागणी केलेली कागदपत्रे दाव्यात असणे आवश्यक आहे. याउलट सदरचे कागदपत्रे रेकॉर्डवर नसल्यास दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास अडचण होईल. करिता वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे आणि खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादीने अर्जात मागणी केलेली कागदपत्रे प्रतिवादी क्र.१ संस्थेने न्यायालयात दाखल करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : १४/०२/२०२३

(बी.एस.लखोटे)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.